वर्ष : १३९

Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक ७३ • पृष्ठे : १० • चार रुपये • शुक्रवार १५ मार्च २०१९, पुणे C (शहर आवृत्ती)

मसूदसंदर्भातील निर्णय निराशाजनक

नवी दिल्ली : जैश ए महंमद प्रमुख मसूद अझहरला आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत फेटाळण्यात आला. भारताच्या दृष्टीने हा निर्णय निराशाजनक असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. तसेच, भारताची साथ देणाऱ्या देशांचे आभारही मानले आहेत. पुलवामा हल्ल्यासाठी कारणीभूत असलेल्या दहशतवादी संघटनेच्या प्रमुखावर संयुक्त राष्ट्राला कारवाई करता आली नाही. मात्र, भारत नेहमीच दहशतवादी संघटना, दहशतवादी नेत्यांविरोधात कठोर भूमिका घेत राहणार आणि या नेत्यांवरील कारवाईसाठी भारताचे प्रयत्न या पुढेही सुरू राहतील, असेही परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

भारिप होणार वंचित आघाडीत विलीन

अकोला : लोकसभा निवडणुकीनंतर भारिप बहुजन महासंघ वंचित बहुजन आघाडीत विलीन करणार असल्याची घोषणा भारिपचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली. तसेच लोकसभा निवडणूक ही वंचित बहुजन आघाडीच्या झेंड्याखाली लढणार असल्याचा निर्धारही आंबेडकरांनी बोलून दाखवला आहे. भारिप बहुजन महासंघ या नावाशी माझे भावनिक नाते असले तरी पुढची वाटचाल ही वंचित बहुजन आघाडी म्हणूनच होणार असल्याचेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले. स्मृती इराणी यांनी गांधी परिवारावर जमीन गैरव्यवहाराबाबत केलेले आरोप हा दबाव वाढविण्याचा आणि धमकावण्याचा प्रकार आहे, असेही सांगितले.

सीएसटीजवळचा पादचारी पूल कोसळला

पाच मृत्युमुखी; ३४ जण जखमी

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळ (सीएसटी) असलेला पादचारी पूल कोसळून गुरुवारी सायंकाळी मोठी दुर्घटना घडली. या पुलाचे छत (स्लॅब) कोसळल्याने त्यात पाच जणांचा मृत्यू झाला असून, ३४ जण जखमी झाले आहेत. जखमींना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, काहींची प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ऐन गर्दीच्या वेळी हा पूल कोसळल्याने मोठा गोंधळ उडाला. या पुलावर असलेले क्रॉंक्रिट पूर्णपणे अलग झाले आहे. त्यामुळे मागे केवळ पुलाचा सांगाडा उरला आहे. हा सांगाडादेखील केव्हाही कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या जुलैमध्ये अंधेरी रेल्वे स्टेशनजवळील गोखले पुलाचा काही भाग कोसळला होता. त्याआधी, सप्टेंबर २०१७ मध्ये एल्फिस्टन रोड आणि परेल रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या पादचारी भागावर प्रचंड चेंगराचेंगरी झाली होती. यामध्ये २२ जणांचा मृत्यू झाला होता.

राष्ट्रवादीच्या पहिल्या यादीत पार्थही नाही आणि माढाही

सुप्रिया, उदयनराजे यांना उमेदवारी

मुंबई, (प्रतिनिधी) : राष्ट्रवादी काँग्रेसने गुरुवारी १२ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. विद्यमान खासदार सुप्रियाताई सुळे, उदयनराजे भोसले, धनंजय महाडिक यांच्याबरोबरच सुनील तटकरे (रायगड), राजेश विटेकर (परभणी), राजेंद्र शिंगणे (बुलढाणा) आदींचा पहिल्या यादीत समावेश आहे. मात्र, ज्यांच्यासाठी शरद पवार यांनी माढ्यातील आपली उमेदवारी मागे घेतली त्या पार्थ पवार यांच्या नावाचा समावेश पहिल्या यादीत नाही. तसेच माढ्याचे उमेदवार कोण हेही अद्याप गुलदस्त्यात आहे. काँग्रेस पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसने काल लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उमेदवारांची नावे जाहीर करताना, उर्वरित उमेदवारही येत्या दोन तीन दिवसात जाहीर करण्यात येईल, अशी माहिती दिली. मावळत्या लोकसभेत राष्ट्रवादीचे सहा खासदार होते. यापैकी बिहारमधून निवडून आलेल्या तारीक अन्वर यांनी पूर्वीच राजीनामा देऊन राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिली आहे. उर्वरित पाचपैकी विजयसिंह मोहिते पाटील यांचा अपवाद वगळता, सुप्रिया सुळे (बारामती), उदयनराजे भोसले (सातारा), धनंजय महाडिक (कोल्हापूर) व मोहम्मद फैजल (लक्षद्वीप) या विद्यमान खासदारांचा पहिल्या यादीत समावेश आहे. याशिवाय अपेक्षेप्रमाणे माजी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे (रायगड) यांचा पहिल्या यादीत समावेश आहे. बुलढाण्यातून माजी मंत्री राजेंद्र शिंगणे यांना, तर जळगावमधून माजी राज्यमंत्री गुलाबराव देवकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. परभणीतून राजेश विटेकर, उत्तर पूर्व मुंबईतून संजय दिना पाटील, ठाण्यातून आनंद परांजपे, कल्याणमधून बाबाजी बाळाराम पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी-काँग्रेसमध्ये, तसेच मित्रपक्षांमध्ये चार ते पाच जागांबाबत चर्चा सुरू असून, येत्या दोन दिवसांत सर्व उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल, असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले.

महासंग्राम लोकसभा २०१९

माढा, मावळ, नगर प्रतीक्षेत

शरद पवार हे माढा मतदारसंघातून निवडणूक लढवणार होते. परंतु अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांनी मावळमधून निवडणूक लढवण्याचा आग्रह धरल्याने एकाच कुटुंबातील तीन-तीन उमेदवार नको म्हणून पवार यांनी निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला आहे. पार्थ यांनी परवा एकवीरा देवीचे दर्शन घेऊन प्रत्यक्ष प्रचाराला सुरुवातही केली आहे. मात्र त्यांच्या नावाची औपचारिक किंवा अधिकृत घोषणा काल झाली नाही. तसेच माढा मतदारसंघात पर्यायी उमेदवार कोण आसणार हेही अजून गुलदस्त्यात आहे. सुजय विखे यांच्या उमेदवारीवरून निर्माण झालेल्या वादामुळे नगरची जागा राष्ट्रवादीसाठी प्रतिष्ठेची झाली आहे. स्वतः शरद पवार यांनी परवा नगर जिल्ह्यातील नेत्यांची बैठक घेऊन आढावा घेतला होता. येथून संग्राम जगताप यांचे नाव निश्चित झाल्याची चर्चा असली तरी पहिल्या यादीत नगरचा समावेश नाही.

राजू शेट्टी यांना हातकणंगलेत पाठिंबा

राष्ट्रवादीकडून खासदार राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेसाठी हातकणंगलेची एक जागा सोडण्यात आली आहे. राजू शेट्टी यांनी बुलढाणा, वर्धा, हातकणंगले अशा तीन जागांची मागणी केली होती. त्यापैकी बुलढाणा येथील जागेसाठी राष्ट्रवादीने राजेंद्र शिंगणे यांना उमेदवारी दिली आहे. आघाडीचा अंतिम निर्णय झालेला नसला तरी राष्ट्रवादीने ही जागा राजू शेट्टी यांच्यासाठी सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

राफेलवरील निर्णय राखून ठेवला

नवी दिल्ली : राफेलबाबतचा कॅगचा अहवाल सादर करताना सरकारकडून चूक झाली. या अहवालातील तीन पाने गायब झालेली आहेत. ही तीन पाने आम्हाला रेकॉर्डवर आणायची आहेत, असे नमूद करत महाधिवक्ता के. के. वेणुगोपाल यांनी केंद्र सरकारच्या विशेषाधिकाराचा मुद्दा जोरकसपणे सर्वोच्च न्यायालयात मांडला. चोरीस गेलेल्या कागदपत्रांना आधार बनवून फेरविचार अर्ज दाखल केला जाऊ शकत नाही. संबंधित विभागाच्या परवानगीशिवाय ही कागदपत्रे न्यायालयात सादर करण्यात आलेली आहेत. हा सरळसरळ 'कार्यालयीन गोपनीय कायद्या'चा भंग असून या मुद्द्यावर संबंधित अर्ज फेटाळण्यात यावे, अशी मागणी सरकारतर्फे करण्यात आली.

तर मसूदला भारताकडे सोपवा : सुषमा स्वराज

नवी दिल्ली : दहशतवाद आणि चर्चा एकत्र केली जाऊ शकत नाही. जर पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान इतकेच उदार असतील तर मग त्यांनी मसूद अझहरला भारताकडे सोपवावे, अशा परखड शब्दांत परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवादी संघटनांविरोधात कारवाई करत नाही, तोपर्यंत त्यांच्याशी चर्चा केली जाणार नाही, असेही स्वराज यांनी स्पष्ट केले.

... तर आम्ही इतर पर्यायांचा वापर करू

अमेरिकेचा चीनला इशारा

वॉशिंग्टन : चीनने पुन्हा एकदा जैश ए महंमदचा प्रमुख मसूद अझहर याला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित होण्यापासून वाचविले आहे. त्यानंतर आता अमेरिकेनेही चीनला कडक शब्दांत इशारा दिला आहे. चीनच्या अशा धोरणाने संयुक्त राष्ट्रातील इतर सदस्य देशांना अन्य पर्यायांचा वापर करावा लागेल. जर चीन दहशतवादासंदर्भात गंभीर असेल, तर त्याने पाकिस्तान आणि इतर देशातील दहशतवाद्यांचा बचाव करू नये, असे अमेरिकेच्या राजनैतिक अधिकाऱ्याने सांगितले आहे. अमेरिकेप्रमाणेच अन्य सदस्य राष्ट्रांनीही चीनला डावलून मसूद अझहरवर मोठी कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. चीन वारंवार अडथळा आणून मसूदला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित होण्यापासून वाचवत असेल, तर सक्तीने वेगळी कारवाई केली जाईल, असे अन्य सदस्य राष्ट्रांनी म्हटले आहे.

पुलवामातील हल्ल्याची जबाबदारी जैश ए महंमदने स्वीकारली होती. या हल्ल्यानंतर अझहरची एक ऑडियो टेप समोर आली होती. यात भाचा उस्मानच्या हत्येचा बदला घेण्याची सूचना त्याने दहशतवाद्यांना केली होती. मात्र, चीनने संयुक्त राष्ट्रात जैश आणि अझहरचा संबंध नसल्याचा दावा केला.

अग्रलेख पान ४ — पुन्हा चीनचा अडसर

दुबळे मोदी चीनच्या अध्यक्षांना घाबरतात : राहुल

नवी दिल्ली : मसूद अझहरच्या बाबतीत चीनने घेतलेल्या भूमिकेनंतर काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी पंतप्रधानांवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दुबळे असून ते चीनला घाबरतात, असे राहुल यांनी ट्विट केले आहे. भारताविरुद्ध कृती करणाऱ्या चीनविरुद्ध पंतप्रधानांच्या तोंडून चकार शब्दही निघाला नाही, असेही राहुल यांनी म्हटले आहे. पंतप्रधान मोदी गुजरातमध्ये शी जिनपिंग यांच्यासोबत झोके घेतात, दिल्लीत गळाभेट घेतात आणि चीनमध्ये त्यांच्यासमोर झुकतात. हे मोदींचे 'चीन धोरण' आहे, असेही राहुल यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

पवारांचे वक्तव्य दुर्दैवी : विखे-पाटील

मुंबई, (प्रतिनिधी) : चिरंजीव सुजय यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने अडचणीत आलेले विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील गुरुवारी प्रथमच प्रसार माध्यमांसमोर आले. आपली बाजू आपण पक्षश्रेष्ठींसमोर मांडणार असून ते जो निर्णय देतील तो मान्य करू, असे सांगताना विरोधी पक्षनेतेपदाचा स्वतःहून राजीनामा देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार यांनी स्व. बाळासाहेब विखे-पाटील यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करताना, नगरला आपण कोणाच्याच प्रचाराला जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसने नगर लोकसभा मतदारसंघ सोडण्यास ठाम नकार दिल्याने सुजय विखे यांनी भाजपात प्रवेश करून उमेदवारी मिळवली आहे. विरोधी पक्षनेत्यांचाच मुलगा भाजपमध्ये गेल्याने काँग्रेसची चांगलीच पंचाईत झाली असून राधाकृष्ण विखे हेही अडचणीत आले आहेत. ते विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा देणार असल्याची चर्चा परवापासून सुरू होती. मात्र काल पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट करताना आपण राजीनामा दिलेला नसल्याचे राधाकृष्ण यांनी स्पष्ट केले. भाजपात जाण्याचा सुजयचा व्यक्तिगत निर्णय आहे. त्याला त्याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे. पक्षश्रेष्ठींना भेटून आपण आपली बाजू मांडणार असून ते जो निर्णय देतील तो मान्य करू असे विखे यांनी सांगितले.

काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीतील जागावाटपाचा निर्णय होण्यापूर्वीच राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी माझ्या वडिलांबाबत वक्तव्य केले. आजोबांबाबत पवार बोलल्याने नाराज झालेल्या सुजयने भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याचा दावा राधाकृष्ण यांनी केला. पवार यांच्या मनात विखे कुटुंबाबाबत द्वेष आहे. एका हयात नसलेल्या व्यक्तीबाबत बोलणे चुकीचे आहे. पवार यांनी आघाडी धर्म पाळला नाही, असा आरोप विखे यांनी केला. पवारांच्या वक्तव्यामुळे दुःख झाले. त्यांनी जुने वाद आता विनाकारण काढण्याचा काहीही संबंध नव्हता, यातून त्यांच्या मनातील द्वेष स्पष्ट होतो, त्यामुळे आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार नगरमध्ये करणार नसल्याचे स्पष्ट केले.

थोरात पक्षश्रेष्ठांपेक्षा मोठे आहेत का?

काँग्रेसने विखे कुटुंबाला खूप काही दिलं आहे. त्यांच्या सगळ्या अपेक्षा पक्षाने पूर्ण केल्या आहेत. त्यामुळे विखेंनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली होती. याबाबत विचारता, 'मला जे सांगायचे आहे ते पक्षश्रेष्ठांना सांगेन. बाळासाहेब थोरात पक्षश्रेष्ठांपेक्षा मोठे आहेत का? मी त्यांना सांगण्यास बांधील नाही. बाळासाहेब थोरात यांच्याकडे कपबशी, नारळ, रोलर कुठून आले हे मला माहीत आहे. त्यांनी मला पक्ष निष्ठा सांगू नये,' असे उत्तर विखे पाटील यांनी दिले. विखे पाटील यांच्याबाबत पक्षश्रेष्ठ काय निर्णय घेणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

दहशतवादी पाकिस्तानात मोकाट कसे?

इस्लामाबाद : पाकिस्तान पीपल्स पार्टीचे अध्यक्ष आणि पाकिस्तानी संसदेचे सदस्य बिलावल भुट्टो जरदारी यांनी इम्रान खान यांना दहशतवादाच्या मुद्द्यावरून घरचा आहेर दिला आहे. बिलावल यांनी पाकिस्तानमध्ये दहशतवादी संघटनांवर सरकारचा वचक नसून ते मुक्तपणे काम करत असल्याचा आरोप केला आहे. दुसऱ्या देशांमध्ये दहशतवादी कारवाया करणारे दहशतवादी पाकिस्तानमध्ये मोकाट कसे फिरत आहेत असा सवाल बिलावल यांनी सत्ताधाऱ्यांना केला आहे. इम्रान खान यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत असणाऱ्या तेहरीक-ए-इन्साफ पक्षाच्या सरकारला बिलावल यांनी दहशतवादाच्या मुद्द्यावरुन चांगलेच धारेवर धरले. पाकिस्तानमधील सक्रिय दहशतवादी संघटनांवर कठोर कारवाई केली जात नाही. माझ्या आईचीही हत्या याच कारणामुळे झाली. हे दहशतवादी गट पाकिस्तानमध्ये लहान मुलांचे प्राण घेत आहेत, असेही सांगितले.

पुण्यात मतदान यंत्रावर राहणार काँग्रेसची करडी नजर

संजय ऐलवाड

पुणे : आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसतर्फे ईव्हीएम मशिनमध्ये कोणतेही फेरबदल होऊ नयेत यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. पुण्यात येणाऱ्या मतदान यंत्रात कोणत्याच प्रकारचे फेरफार केले जाऊ नये म्हणून सर्व मशिनच्या क्रमांकांची मागणी काँग्रेसतर्फे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली जाणार आहे. तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेले क्रमांक आणि प्रत्यक्षात बूथवर वापरली गेलेली यंत्रे याची खातरजमाही केली जाणार आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघात सुमारे १ हजार ९४४ बूथ असणार आहेत. त्यामुळे दोन हजाराच्या जवळपास ईव्हीएम मशिन शहरात दाखल होतील. निवडणुकीत ज्या यंत्राचा वापर केला जाणार आहे, त्या सर्व यंत्रांचे क्रमांक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून मागवून घेतले जाणार आहेत. त्यानंतर प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी

> "मतदानाच्या काळात बऱ्याच वेळा ईव्हीएम मशिन यंत्रांमध्ये फेरफार करण्यात आल्याच्या घटना घडत आहेत. तसेच, यंत्राच्या संख्येबाबतही बऱ्याच वेळा घोळ होतो. त्यामुळे खबरदारी म्हणून पुणे लोकसभा मतदारसंघात वापरल्या जाणाऱ्या यंत्रांचे क्रमांक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून मागून घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसे पत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पाठविले जाणार आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेले यंत्रांचे क्रमांक आणि प्रत्यक्ष वापरल्या गेलेल्या मशिनच्या क्रमांकांची पडताळणी केली जाणार आहे.
> – **सचिन आडेकर**, बूथ कमिटी समन्वयक, पुणे शहर काँग्रेस

शहरातील प्रत्येक मतदार केंद्रावरील पक्षाच्या मतदान प्रतिनिधींकडे या क्रमांकांची यादी दिली जाणार आहे. हे प्रतिनिधी त्या केंद्रावरील ईव्हीएम यंत्राचा क्रमांक समन्वय समितीच्या प्रमुखाला कळवतील. आणि सर्व यंत्रांचे क्रमांक एकत्र झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी यंत्रांचे दिलेले क्रमांक आणि प्रत्यक्ष मतदानासाठी वापरल्या गेलेल्या यंत्रांच्या क्रमांकांची पडताळणी केली जाणार आहे.

मतदान काळात परराज्यात आगाऊ ईव्हीएम यंत्रे आढळल्याच्या घटना घडल्या आहेत. तर काही ठिकाणी प्रत्यक्ष मतदानासाठी वापरल्या गेलेल्या यंत्रांपेक्षा अधिक यंत्रे आढळून आली असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी पुणे काँग्रेसतर्फे ईव्हीएम यंत्रांबाबत विशेष खबरदारी घेतली जाणार आहे. त्यासाठी योग्य नियोजनही करण्यात येत आहे. मतदान पार पडल्यानंतर किती ठिकाणी राखीव यंत्रांचा वापर झाला, याची माहितीही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून घेतली जाणार असल्याचे काँग्रेस पदाधिकारी सांगत आहेत.

प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदान यंत्रावर व तेथील दिवसभरातील प्रक्रियेवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी ब्लॉक अध्यक्ष व केंद्रावर नेमण्यात आलेल्या मतदान प्रतिनिधीची असणार आहे. एका मतदान केंद्रावर सुमारे ८०० ते १२०० मतदार असणार आहेत. या संख्येनुसार प्रत्यक्ष मशिनवर झालेले मतदान आणि मोजणीच्या वेळी दाखवले जाणारे मतदान यावरही काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे विशेष लक्ष असणार आहे.

जाता जाता – गणेश काटकर

शाबजी, मला गुरखा म्हणा, वॉचमन म्हणा, पण प्लीज 'चौकीदार' म्हणून माझा अपमान करू नका...

रविवारच्या केसरीत

आता उगवतील आघाड्या आणि युत्या

लोकसभा निवडणुकीचा महामहोत्सव राजकीय पक्ष, मतदारांची परीक्षा पाहणारा आहे. नव्वद कोटी मतदार असलेली ही जगातली सर्वात मोठी लोकशाही आहे. देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्यानंतर सर्व पक्षांची धावपळ सुरु झाली आहे. आता आघाड्या आणि युत्यांना मात्र लगेच आकार येईल. – **प्रा. शुभंकर दवे**

निवडणुकीवर 'राष्ट्रवादा'ची छाया...?

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वातावरण तापत असतानाच पुलवामा इथे दहशतवादी हल्ला झाला आणि त्यात ४० जवानांच्या प्राण्यांची आहुती पडली. तेव्हापासून निवडणुकीतील आधीचे राफेलसारखे तसंच सर्वसामान्यांच्या आयुष्याशी निगडित मुद्दे मागे पडून राष्ट्र आणि क्षात्रतेजाची चर्चा सुरू झाली. या बदललेल्या परिस्थितीत आगामी निवडणुकांवर याच विषयाची छाया असण्याची शक्यता नाकारता येत नाही. – **जयदेव डोळे**

अर्था अर्थी –शेअर बाजारात सुगीचे संकेत –**महेश देशपांडे**

जंगल कथा– हत्तींच्या भावविश्वात...– राजीव पंडित

राज्य रंग –'हिंदी पट्टा' जपण्याची धडपड – **शिवशरण यादव**

खास लेख– मंदावलेलं अर्थकारण, वाढती बेरोजगारी– प्रा. डॉ. अशोक ढगे

या शिवाय– ✲ भविष्य ✲ शब्दकूट ✲ असा वाचकप्रिय मजकूर आणि *'हितगुज'*